SWACH
A higher level of self-reliance

खंड १, अंक ३
एप्रिल २०१२



# वार्तापत्रक

## पेन्शन परिषद : सुरक्षा अधिकाराची मागणी

वर्षानुवर्षे मेहनत केल्यावर निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षा आणि मानसिक शांतता मिळावी ही आपल्या सगळयांचीच रास्त अपेक्षा असते. परंतु दुर्दैवाने अजूनही असंघटीत क्षेत्रातील कामगारांना मात्र असा वृधापकाळातील निर्धास्तपणा लाभत नाही. ढोले पाटील रोडवर काम करणाऱ्या ६७ वर्षीय 'स्वच्छ'च्या सदस्या सावित्रीबाई 'हे असे का?' हा सवाल विचारत आहेत. त्या म्हणतात, आता माझे वय झाले आहे. मला पुर्वीसारखे काम करणे जमत नाही. पण तरीही मलादेखील कधीतरी पेन्शन मिळेल या आशेवर मी काम करत दिवस रेटते आहे.

औंध येथे काम करणाऱ्या 'स्वच्छ'च्या आणखी एक सदस्या, रिबेक्का केदारी म्हणतात, आमच्यातील कितीतरी कचरावेचकांनी या पेन्शनची वाट पहात शेवटचा श्वास घेतला. जर सरकारी कर्मचाऱ्यांना आणि इतर कायमस्वरुपी कामगारांना निवृत्तीवेतन मिळू शकते तर आम्हांला का नाही? आमच्यासारखी अंगमेहनत करणारे लवकर थकतात, आणि काम करणे आम्हांला कठीण जाते, खरं म्हणजे आम्हांला तर वयाच्या ५०व्या वर्षापासूनच पेन्शन लागू झाले पाहिजे.

आपल्या देशातील एकुण कामगारवर्गाच्या ९०% कामगार हे असंघटीत क्षेत्रात काम करतात आणि त्यातील ७० % मजूर हे अतिशय कमी मोबदल्यावर काम करतात. कचरा गोळा करणे, भाज्या विकणे, घरगुती कामे करणे, ओझी वाहणे अशा अनेक अत्यावश्यक सेवा ते आपल्याला पुरवतात. मग जेव्हा त्यांना अशी अंगमेहनतीची कामे झेपेनाशी होतात तेव्हा त्यांना काही सामाजिक सुरक्षा मिळणे आवश्यक नव्हे का? कामगार वर्गातील ज्या घटकाला अशा मोफत किंवा अर्थसहायित सामाजिक सुरक्षेची नितांत गरज आहे त्यांनाच त्यापासून वंचित का रहावे लागावे?

२५ फेब्रुवरी २०१२ रोजी पुण्यात झालेल्या पेन्शन परिषदेत हे आणि अशाप्रकारचे अनेक प्रश्न उपस्थित केले गेले. निवृत्तीवेतन आणि सामाजिक सुरक्षेच्या आपल्या मागण्या मांडण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातून असंघटीत क्षेत्रात काम करणारे जवळ जवळ ४०,००० कामगार या परिषदेला हजर राहिले.





कचरा वेचक, घरगुती कामगार, हमाल यासारखे अनेक, वाकलेल, गांजलेले कामगार, ज्यात महिलांचा समावेश अधिक होता, स्वखर्चाने आपल्या मागण्या मांडण्यासाठी या परिषदेला उपस्थितीत राहिले.

कामगार संघटनेचे नेते डॉ. बाबा आढव, प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या आनि मॅगसेसे पुरस्कार विजेत्या श्रीमती अरुणा रॉय तसेच आमदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी या सभेला संबोधित केले.

**या बैठकीत तीन विषयांवर प्रस्ताव मांडण्यात आले: आरोग्यसेवा, सामाजिक सुरक्षा आणि निवृत्तीवेतन. यातील काही महत्वाच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत:**

- अधिकृतपणे जे दारिद्र्य रेषेखाली नाहीत अशांनादेखील सामावून घेणारी सर्वसमावेशक आरोग्य सेवा निर्माण केली जावी.
- सरकारी रुग्णालयांनाच अधिक सशक्त करुन नाईलाज असेल तेव्हाच, खाजगी आरोग्यसेवा पुरवणाऱ्यांचा उपयोग करावा.
- व्यवसायजन्य आरोग्य सेवांना प्राधान्य दिले जावे.
- एका चांगल्या सामाजिक सुरक्षा अधिनियमाच्या दिशेने वाटचाल करत असतानाच, युडब्ल्यूएसएसएचे लाभ मिळवणे अधिक सुकर करावेत.

सहकारनगर येथील नगरसेवक आणि जीबी चे प्रवक्ते, श्री सुभाष जगताप यांच्या मते तर शारीरिक श्रम करणाऱ्या सर्व कामगारांना एक वैधिक हक्क म्हणून निवृत्तीवेतन मिळाले पाहिजे. या क्षेत्रात काम करणाऱ्या दलित आणि इतर उपेक्षीत गटातील कामगारांना निवृत्तीवेतनामुळे आत्मसन्मानाने जगता येईल असे त्यांचे म्हणणे आहे.

> संघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांना मिळणारे किमान वेतन, रजा आणि निवृत्तीवेतनासारखे लाभ, असंघटीत क्षेत्रातील कामगारांनादेखील मिळावेत यासाठी सरकारने कोणतेही कायदे अंमलात आणू नयेत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शोषित आयुष्य जगून आणि मेहनत करुनदेखील या कामगारांच्या हाती शेवटी काहीच लागत नाही.
>
> थर्मॅक्सच्या माजी अथक्ष्य, श्रीमती अनु आगा यांचा संदेश

आज जरी सावित्रीबाई आणि त्यांच्यासारख्या इतरांना आयुष्यभर कष्ट करुन, सेवा पुरवूनदेखील विश्रांती मिळणार नसली तरी पेन्शन परिषदेत भाग घेतलेल्या कामगारांनी आणि कार्यकर्त्यांनी हा लढा देशव्यापी करुन आपल्या मागण्या पूर्ण होईपर्यंत तो चालू ठेवण्याचा निर्धार केला आहे.

## *Events:*

### ’स्वच्छ’ला तळवलकर ट्रस्टचा पुरस्कार प्रदान



संस्थेच्या कामामुळे पर्यावरणावर होणाऱ्या सकारात्मक परिणामांचे अभिनंदन करीत तळवलकर ट्रस्टने ’स्वच्छ’ला अवनी मित्र पुरस्कार प्रदान केला. अवतरण पत्र आणि रु. २५,०००/-, असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

२ फेब्रुवरी २०१२ रोजी झालेल्या पारितोषिक वितरण संमारंभात बोलताना बेबी मोहिते, या ’स्वच्छ’ च्या सदस्या म्हणाल्या, जे जे म्हणून शक्य असेल त्याचा आम्ही पुर्नवापर करतो, उदाहरणार्थ, कागद, प्लास्टिक, धातू, काच इत्यादी. यामुळे खाणकाम आणि उत्खनन करण्याचे प्रमाण कमी होऊ शकते व पर्यावरण सुरक्षित रहाते.

### वीरबालांबरोबर ’स्वच्छ’ची जोडीदारी

पुण्यातील रहिवाशांनी टाकलेला कचरा गोळा करण्याकरता आंतरराष्ट्रीय सहाय्य? पण नुकतेच मार्च मधे जेव्हा नागपुर चाळ येथील पाटबंधारे सोसायटीचे पटांगण ’स्वच्छ’च्या सदस्यांबरोबर १५ आंतरराष्ट्रीय वीरबालांच्या गटाने साफ केले, तेव्हा हेच घडले. या एकत्रित प्रयत्नांतून, पाहुण्या वीरबालांना ’स्वच्छ’ करीत असलेल्या कामाची माहिती मिळाली. संगमवाडी येथील संगम वर्ल्ड सेन्टर येथे रहात असलेल्या या वीरबाला पर्यावरणाशी संबंधीत प्रश्न हाताळत होत्या आणि त्या अनुषंगाने कचरा गोळा करुन त्याचा पुर्नवापर करणाऱ्या ’स्वच्छ’ चे कार्य समजून घेणे त्यांना आवश्यक वाटले. ’स्वच्छ’च्या सदस्यांची कचऱ्याचे वर्गीकरण करण्याची पद्धत त्यांना खुपच वेधक वाटली. पुण्यातील नागरिकांना दररोज कचरा गोळा करण्याची सेवा पुरवणाऱ्या ’स्वच्छ’चे त्यांना खुप कौतुक वाटले. ओल्या कचऱ्याचा निचरा करण्यासाठी वापरण्यात येत असलेले बायोगॅस आणि खत निर्मितीचे उद्योग पाहून त्यांना आनंद झाला.

### जागरूकता भेट: उरुळी देवाची

इन्टाक आणि पुण्याच्या ’वसुंधरा’ संस्थेबरोबर, ’स्वच्छ’ने २३ फेब्रुवरी २०१२ रोजी उरुळी देवाची येथील डम्पींग ग्राऊन्डला भेट देण्याचा कार्यक्रम आयोजित केला होता. घन कचरा व्यवस्थापनेतील प्रश्न, निचऱ्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाठवला जाणारा कचऱ्याचा ढिगारा आणि स्थानिक रहिवाशांना त्यामुळे होणाऱ्या त्रासाबाबत जागरुकता वाढवण्याकरता या भेटीचे आयोजन केले होते. ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांसहीत एकुण ३० जणांनी या कार्यक्रमात भाग घेतला. ’स्वच्छ’ची प्रतिनिधी या नात्याने धनश्री गरव कार्यक्रमाला उपस्थित होत्या.

उरुळीला पोचल्यावर स्थानिक कार्यकर्ते दिलीप मेहता आणि इतर गावकऱ्यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डम्पींग ग्राऊन्डच्या परिसरातून फिरत असताना घन कचरा व्यवस्थापनेचे नियम पीएमसी पाळत नसल्याने निर्माण होणाऱ्या समस्यांविषयी त्यांनी पहुण्यांशी चर्चा केली. धनश्रीनेदेखील ’स्वच्छ’च्या सध्याच्या कामाविषयी माहिती दिली. ती म्हणाली की नागरिकांच्या सहाय्याने डम्पींग ग्राऊन्ड वर येणाऱ्या कचऱ्यात घट होऊन त्यावर येणारा भार कमी होऊ शकतो. साधारण १५ ते २०% अजैविक कचऱ्याचा पुर्नवापर ’स्वच्छ’चे सदस्य करतात. धनश्रीने हेदेखील लक्षात आणून दिले की, जरी औद्योगिक मार्गांनी डम्पींग ग्राऊन्डवरा येणारा कचरा कमी केला गेला तरी ह्या मार्गांमुळे प्रदुषण निर्माण होते, उर्जेचा वापर बऱ्याच जास्त प्रमाणात होतो आणि कचरावेचकांच्या उपजिविकेला धोका निर्माण होतो.

### वी - कलेक्ट योजनेला जोरदार प्रतिसाद

पुणे नागरिकांना ज्या अनेक उपयुक्त सेवा ’स्वच्छ’ पुरवत असते त्यातील वी - कलेक्ट ही एक यशस्वी सेवा आहे. या योजनेत ज्या सोसायटीत वी कलेक्ट मोहिम आयोजित केली असेल तेथे येऊन, ’स्वच्छ’चे सदस्य, जुन्या पण वापरता येण्यासारख्या आणि पुर्नवापर होऊ शकेल अशा वस्तु घेऊन जातात.

गेल्या तीन महिन्यात पुण्याच्या औंध ते संगमवाडी, घोले रोड ते हडपसर या भागांतील २१ सोसायट्यांमधे वी - कलेक्ट मोहिम आयोजित केली गेली ज्यात २८००हून अधिक कुटुंबांनी भाग घेतला. ह्यात काचेच्या आणि प्लास्टिकच्या वस्तुं व्यतिरिक्त, कपडे, बूट, टी व्ही, फ्रीज, कूलर्स, प्रिंटर्स मिक्सर्स इत्यादी वीजेची उपकरणे होती.

पुण्याच्या नागरिकांनी या योजनेला चांगला प्रतिसाद दिला आहे. कोथरुडच्या प्राची कुलकर्णींना वापरता येण्यासारख्या जुन्या वस्तु इतर कोणाला तरी वापरता येत आहेत ही कल्पना आवडली. तर अश्विनी पवार यांच्या मते, एकाला नको असलेली वस्तु, दुसऱ्या एखाद्या गरजु व्यक्तिला मिळवून देणाऱ्या अशा योजनांना प्रोत्साहन दिले पाहिजे असे वाटते.

आपल्या विभागात जर आपल्याला वी - कलेक्ट मोहिम करायची असेल तर, आमच्या हेल्पलाईनवर आमच्याशी संपर्क साधा.

### कचरा ते उर्जा परिवर्तक: मुद्दे आणि प्रश्न

कचऱ्याचा निचरा करण्याचा प्रश्न सोडवण्याकरता पीएमसी मोठ्या प्रमाणावरील औद्योगिक उपाय शोधत आहे. दिवसाला १००० टन कचऱ्यावर प्रक्रिया करु शकणारे कचऱ्यापसून उर्जानिर्मिती करणारे एक परिवर्तक चालवण्याकरता पीएमसीने हँगर बायोटेकला आमंत्रित केले आहे. रोचेम सेपरेशन सिस्टिम्स (इंडिया) प्रायवेट लिमिटेडला रु ११० कोटीचा दुसरा असा प्रकल्प चालवण्यास दिला गेल्याचे समजते. ’स्वच्छ’च्या १०० कचरावेचक आणि कर्मचाऱ्यांनी मार्च महिन्यात रोचेमच्या प्रकल्पाला भेट देऊन पुर्नवापर करता न येणाऱ्या कचऱ्याचा निचरा कसा करतात ते समजून घेतले.

रामटेकडी औद्योगिक क्षेत्रात, पीएमसीने दिलेल्या २.५ एकर जागेवर, रोचेमचा हा प्रकल्प उभा आहे. पीएमसीकडून मिळालेल्या लेटर ऑफ इंटेन्ट (एलओआय) प्रमाणे हा प्रकल्प दररोज ७०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करेल. भेटीच्या वेळी उपायुक्त प्रमोद यादव म्हणाले की, यात ओला कचरा किंवा मोडलेले बेसिन जात नाही पण रबरचे टायर्स, गाद्या, बूट यांचा वापर इथे करता येतो. एलओआयमधे असेही म्हटले आहे की पीएमसी रोचेमला रु ३०० प्रति टन एवढा खर्च देईल. जरी भेटीच्या वेळी हा प्रकल्प केवळ चाचणी तत्वावर चालवला जात होता आणि हे माहितीपत्रक प्रकाशीत होण्याच्या तारखेपर्यंत तो सुरु झालेला नव्हता, तरीदेखील ही भेट खुप माहितीपूर्ण होती. भेटीला आलेले कचरावेचक जरी आधी ही मोठ्ठाली यंत्रे पाहून दबून गेले तरी नंतर

ह्या कचऱ्याचे वर्गीकरण करणे कोणाची जबाबदारी असेल असा प्रश्न त्यांना पडला. त्यांना अशी भीती होती की कचऱ्याचे वर्गीकरण करायला व तो ठेवायला, त्यांच्याजवळ कायदेशीर जागा नसताना, हा अधिकचा भारदेखील त्यांच्याच खांद्यावर टाकला जाईल.

गॅसीफिकेशनच्या प्रक्रियेने, इथे कचऱ्यातून वीज निर्माण केली जाईल हे कळल्यावर एक कचरावेचक महिला म्हणली, अरे वा! म्हणजे मग ही वीज आमच्या घरांतून आणि वस्त्यांमधूनदेखील येईल का?

पीएमसीच्या या नव्या प्रकल्पाचे कोणते परिणाम होतात व पुण्यातील कचऱ्याच्या परिस्थितीत त्यामुळे काही फरक पडतो का, ते पाहण्यास कचरावेचक उत्सुक आहेत.

## प्रशिक्षण

### जैविक कचरा परिवर्तक प्रशिक्षण

नव्या तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरता आवश्यक असलेली उच्चस्तरीय कौशल्ये मिळवण्याकरता प्रशिक्षण देणे हे कार्यक्षमतेच्या दृष्टीकोनातूनच नव्हे तर कामगाराच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातूनदेखील गरजेचे असते. 'स्वच्छ'च्या सदस्यांना नुकतेच जैविक कचरा परिवर्तकाचा योग्य वापर करण्याकरता प्रशिक्षण देण्यात आले.

ओल्या कचऱ्याचे खतात रुपांतर करणारे ओडब्ल्युसी (ऑरगॅनिक वेस्ट कन्वर्टर) हे एक अवजड विद्युत यंत्र आहे. औंध येथील 'आयुका'सह पुण्यातील अनेक कंपन्या आणि संस्थांनी आपआपल्या जागांमधे ही यंत्रे बसवली आहेत व 'स्वच्छ'चे एकुण २५ सदस्य ती चालवतात. यंत्रे वापरत असताना, काही दुखापत अथवा अपघात होऊ नयेत यासाठी, एक्सेल इंडस्ट्रीजच्या निलेश भगत यांनी, तीन प्रशिक्षण सत्रांचे आयोजन केले होते. यामधे यंत्रांची डागडुजी आणि सुरक्षा, खताच्या दर्जाची निवड करणे आणि

खत बनवण्याची प्रक्रिया यांचा समावेश केला होता. 'आयुका' ओडब्ल्युसी वर काम करीत असलेल्या इतर व्यावसायिकांची प्रशिक्षणार्थींनी भेट घेऊन, त्यांच्याशी चर्चा केली.

### काम करताना संगीत




अलका पावंगडकरांच्या 'गाण्याच्या कार्यशाळे'ने, काम करत असताना सर्वजणींनी मिळून एकत्र गाणी म्हणण्याच्या आनंदाशी 'स्वच्छ'च्या सदस्यांची पुन्हा नव्याने ओळख करुन दिली.

कार्यशाळेच्या सुरुवातीलाच 'स्वच्छ' च्या १२ सदस्यांनी संगीत म्हणजे काय, व आपल्याला त्याचे महत्व का वाटते यावर आपले विचार मांडले. आत्मविश्वास आणि गटात एकी वाढवण्याकरता गाण्याचा कशा पद्धतीने उपयोग केला जाऊ शकतो, एवढेच नव्हे तर गाताना कशाप्रकारे बसावे हे देखील अलकाने सांगितले. नंतर अलकाने सावित्रीबाई फुलेंचा फोटो दाखवून ह्या प्रतिभावान स्त्रीने, एक साधी मराठी गृहिणी या नात्याने त्यांच्या रोजच्या आयुष्यातील अनुभवांचा उपयोग, महिलांच्या आयुष्यात क्रांती घडवून आणण्याकरता कसा केला व यामधे त्यांची गाणी व कवितांचे काय स्थान होते ते सदस्यांना सांगितले.

जमलेल्या सदस्यांनी 'सावित्रीबाईंची ओवी' आणि 'चला बाई चला' ह्या दोन ओव्या पाठ केल्या. सुरुवातीला लाजणाऱ्या ह्या महिलांना जेव्हा त्या ओव्यांचा अर्थ आणि आपल्या आयुष्याशी असलेले त्यांचे नाते समजले तेव्हा त्यांची भीड चेपून जवळ जवळ दोन तास त्यांनी गाणी म्हटली

### लैंगिक प्रश्नांवर चर्चा

'स्वच्छ'च्या सदस्य ह्या सर्वाधिक महिला असल्या कारणाने लैंगिक प्रश्नांवर चर्चा करणे, त्याविषयी जागरुकता वाढवणे, प्रशिक्षण देणे हा प्रयत्न आमच्या संस्थेत कायम सुरु असतो. आमच्या बऱ्याच सदस्यांना घरगुती आणि लैंगिक छळ, तसेच लैंगिकतेशी संबंधीत इतर प्रश्नांना सामोरे जावे लागते, हे त्यांच्याशी आजवर झालेल्या चर्चांमधून आमच्या लक्षात आले होते. ह्या पार्श्वभूमीवर सदस्यांसमोर एक वेगळा दृष्टीकोन ठेवण्याच्या उद्देशाने 'स्वच्छ'चे सदस्य आणि क्षेत्र कार्यकर्ते असा ३० जणांचा एक गट 'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' नावाचे एक विलक्षण नाटक बघायला गेला.

काही महिला नाटकाचे नाव ऐकुनच मागे झाल्या तर ज्या गेल्या त्यांनादेखील नाटकात मांडलेले प्रश्न व मुद्दे हे भयानक वाटले आणि त्या नाटक अर्धे सोडून निघून आल्या. एका सदस्याच्या मते, आम्हीदेखील या विषयांवर बोलतो पण अशा पद्धतीने आणि इतक्या माणसांसमोर विशेषत: पुरुषांसमोर नाही. काहींना त्यातील कामगार स्त्रियांचे चित्रण आवडले नाही तर काहींना असे संवाद खुल्या रंगमंचावर म्हणणाऱ्या नट्यांच्या धाडसाचे कौतुक वाटले.

लैंगिकतेविषयी जागरुकता वाढवणाऱ्या आमच्या भविष्यातील चर्चांमधे हे नाटक आणि त्यावरील प्रतिक्रिया ह्यावर निश्चितच चर्चा केली जाईल.

## भेटः

### रमेश प्रल्हाद शिंदे



पुण्याच्या एनआयबीएम परिसरात काम करणारा रमेश प्रल्हाद शिंदे गेली पाच वर्षे 'स्वच्छ'शी जोडला गेला आहे. मुंबईत जन्माला आलेल्या, झोपडपट्टीत वाढलेल्या व कधीही शाळेत न गेलेल्या रमेश प्रल्हाद शिंदेची मूल्ये ही संस्थेला अभिमान वाटावी अशीच आहेत. कामाची उत्तम नीतितत्वे असणे, आपल्या अंपग सहचारिणीविषयी आपुलकी बाळगुन तिची योग्य देखभाल करणे आणि आपल्या दोन मुलींना शिक्षण देण्याचा ठाम निर्णय.

पण मुंबईचा रमेश पुण्यात येऊन 'स्वच्छ' चा सदस्य बनला ही गोष्ट योगायोगाचीच म्हणावी लागेल. रमेशचा मेहुणा, राजाराम, पुण्याला कचरावेचकाचे काम करायचा आणि तो 'स्वच्छ' चा सदस्यदेखील होता. पुढे कालांतराने रमेशचे लग्न राजारामच्या बहिणीबरोबर झाले.

लग्नानंतर राजारामने, त्याच्या मेहुण्याने, त्याला पुण्याला बोलावून घेतले व त्याची कचरा वेचण्याच्या व्यवसायाशी ओळख करुन दिली.

पहिले वर्ष रमेशने राजारामच्या मदतीने काम केले. त्याचा दिवश पहाटे ४ ला सुरु व्हायचा. दिवसभर रस्त्यावरील कोरड्या कचऱ्यातून पुर्नवापरायोग्य वस्तु गोळा करणे, नंतर कचराकुंडीतील कचरा निवडणे व त्यानंतर राजारामला मदत करणे. संध्याकाळी पुन्हा तो पुर्नवापरायोग्य वस्तु शोधायला जायचा.

आज दोन सोसायट्यांमधला कचरा गोळा करुन रमेशला चांगले उत्पन्न मिळत आहे.

त्याच्या बायकोची त्याला मदत करण्याची इच्छा असूनही ती अपंग असल्याने रमेश तिला हे काम करु देत नाही. पण तिच्यासाठी घरुन करता येण्यासारख्या कामाच्या तो शोधात आहे कारण त्यामुळे त्याच्या दोन मुलींच्या शिक्षणाला हातभार लागेल. त्या दोघींनाही चांगले शिक्षण मिळावे अशी त्याची इच्छा आहे, व त्या अनुषंगाने आपल्या एका मुलीला त्याने स्वत: काम करीत असलेल्या सोसायटीमधील इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले आहे. त्या शाळेची फी भरणे त्याला परवडत नसल्यामुळे मोबदला म्हणून त्याने शाळेचे झाडलोट व साफ सफाई करण्याचे काम अंगावर घेतले आहे.

रमेश असे मानतो की 'स्वच्छ'च्या बैठकांना हजर राहिल्यामुळे पुष्कळ नवे विचार व प्रश्नांविषयी त्याच्यात जागरुकता निर्माण झाली आणि आपले आयुष्य अधिक  सूकर करण्यासाठी बऱ्याच नव्या योजनांची त्याला माहिती मिळाली. बचतीच्या रकमेवर कर्ज मिळण्याची योजना, कचरा वेचकांच्या मुलांना शिष्यवृत्तीच नव्हे तर त्यांच्या लग्नकार्यातदेखील मदत अशा योजना या सगळयामुळे रमेशची 'स्वच्छ' वर निष्ठा आहे. तो म्हणतो, ' आमच्या अडचणीच्या काळात आम्हांला कायमच संस्थेकडून मदत मिळते.'

कचरा गोळा करुन त्याचे व्यवस्थापन करण्यासारख्या सेवा पुरवणारी 'स्वच्छ' पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित ही स्वयंरोजगार मिळवणाऱ्या कचरावेचकांची सामुहिक संस्था आहे. पुणे महानगरपालिकेने या संस्थेला मान्यता दिली आहे.

# पेन्शन हक्कासाठी 'चलो दिल्ली'



# ई कचऱ्याविषयी प्रशिक्षणाची गरज

'स्वच्छ'च्या मैत्री शंकर यांचे मत : कायदाही तयार करावा

## केवळ दहा टक्के घरांमधून कचऱ्याचे वर्गीकरण

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

ओल्या-सुक्या कचऱ्याच्या वर्गीकरणासाठी महापालिका सातत्याने आवाहन करीत असूनही पुणेकरांचा अल्पप्रतिसाद मिळतो आहे. केवळ दहा टक्के घरांमधून सध्या कचऱ्याचे वर्गीकरण होते आहे. एवढेच नव्हे तर सोसायट्यांनी उभारलेल्या कचरा जिरविण्याच्या प्रकल्पांची अवस्था दयनीय झाली आहे.

'स्वच्छ' संघटनेचे कर्मचारी दररोज सव्वातीन लाख घरांमधून कचरा गोळा करतात; पण नागरिकांच्या असहकार्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे,' अशी तक्रार संघटनेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मालती गाडगीळ यांनी 'मटा'शी बोलताना केली.

महापालिकेने कागद-काच-पत्रा कष्टकरी पंचायत संघटना आणि 'स्वच्छ पुणे सेवा सहकारी संस्थे'ला २००८ मध्ये पुण्यामध्ये घरोघरी जाऊन कचरा गोळा करण्याचे अधिकार दिले आहेत. स्वच्छ संस्थेचे सुमारे दोन हजारांहून अधिक कर्मचारी कचरा गोळा करण्याचे काम करीत आहेत.

### 'स्वच्छ'तर्फे गोळा केला जाणारा कचरा

- झोन १ (कर्वे रोड, घोले रोड, वारजे-कर्वेनगर, औंध) : घर - ७७२६९ : सेवकांची संख्या : ५८८
- झोन २ (संगमवाडी, ढोलेपाटील, येरवडा) : घरं ५४७५७ : सेवक : ३९०
- झोन ३ (सहकारनगर, भवानी पेठ, कसबा विश्रामबाग वाडा, टिळक रोड) : घर ५८११२ : सेवक ४००
- झोन ४ (हडपसर, बिबवेवाडी, धनकवडी) : ९२५७७ : सेवक ४१५

# परदेशी मुलींनी घेतले कचरा व्यवस्थापनाचे धडे

सकाळ



रवडा : नागपूर चाळ येथील पाटबंधारे विभागाच्या सोसायटीच्या मैदानात नागरिकांनी टाकलेला कचरा परदेशी ुलींनी (गाइड) गोळा करून कचरावेचकांना दिला.

सकाळ - २५ फेब्रुवारी २०१२



[illegible]

कचरा गोळा करुन त्याचे व्यवस्थापन करण्यासारख्या सेवा पुरवणारी 'स्वच्छ' पुणे सेवा सहकारी संस्था मर्यादित ही स्वयंरोजगार मिळवणाऱ्या कचरावेचकांची सामुहिक संस्था आहे. पुणे महानगरपालिकेने या संस्थेला मान्यता दिली आहे.

कोथरुड कचरा डेपो, पौड रोड, कोथरुड, पुणे – ४११०३८

टेलिफोन: ०२०–६५०००८१७,
स्वच्छ हेल्पलाईन: ९७६५९९९५००
ई–मेल: swachcoop@gmail.com,
www.swachcoop.com

या वार्तापत्रकात आपले लेख swach.outreach@gmail.com इथे पाठवा.